# डिजिटल युगात सायबर सुरक्षा गरजेची

## मुख्याध्यापिका मीरा आहूजा यांचे प्रतिपादन

पब्लिक पोस्ट । प्रतिनिधी

**अकोला, दि. २८ :** आजच्या ऑनलाइनच्या युगात दिवसेंदिवस सायबर गुन्हे झपाट्याने वाढत असून प्रत्येकाने सुरक्षित राहणे गरजेचे आहे त्यासाठी इंटरनेट चा योग्य वापर करावा, असे प्रतिपादन अकोला येथील गुरुनानक विद्यालयाच्या प्राचार्या मुख्यअध्यापिका मीरा जे. आहूजा यांनी "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" या कार्यक्रमात बोलताना केले. हा कार्यक्रम शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने व क्विक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जे. एम. साबू आणि उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच. जे. खरात यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुनानक विद्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी सायबर वॉरियर्स सानिका वाघमारे व श्रेया बखारे यांनी सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मिडीयाच्या माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाइलच्या माध्यमातून होणारे फ्रॉड्स, तसेच अशी ऑनलाईन फसवणुक होवु नये म्हणुन कोणती काळजी घ्यावी या विषयी महत्त्वपूर्ण आणि सविस्तर माहिती दीली. यामध्ये विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन



मोबाईलच्या योग्य आणि कमीत कमी वापर करण्यासाठी शपथ देण्यात आली. यावेळी सर्व शिक्षक कर्मचारी आणि छात्र मुख्याध्यापिका मीरा आहूजा शिक्षक कर्मचारी आणि छात्र मनोहर केसवाणी शारीरिक शिक्षक संतोषकुमार पंजवानी शिक्षक ,पूनम केसवानी, गीता पंजवानी. वर्षा नलगे,भावना माखीजा,शैलेश कातरे ,सुरेंद्र हिंदवानी , चेतना नागवानी,प्रदीप कीडीले , प्रणीता रेखे, स्वाति चक्रे, आशा आहूजा चेतन कडु, दिनकर राठौड़ उपस्थितित कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आणि सहकार्यासाठी सानिका हिने खंडेलवाल महाविद्यालयातर्फे सर्वांचे आभार व्यक्त केले.

लोकमत मराठी